विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत श्री.रावसाहेब एकनाथ डौले तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश ग्रामपंचायत विभाग/ग्रांप३/ई.क्र. १५०४११४
दिनांक ०२/ ०८ /२०२५
२०२५०८०२०६०१०५

संदर्भ - १ या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/१२२५६३८/२०२४ दिनांक ०८/०५/२०२५ (सेवा निलंबन आदेश)
२.या कार्यालयाचे ज्ञापन दोषारोप क्र.ई क्रमांक १२२५६४६ दिनांक ०८/०५/२०२५
३. श्री. रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी यांचा दोषारोप खुलासा दिनांक १७/०६/२०२५
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(५)

ज्या अर्थी श्री.रावसाहेब एकनाथ डौले,तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर यांचे कार्यालयीन कामकाजात ग्रामपंचायत माळवडगाव येथील महिला ग्रामसभा न घेणे, वरिष्ठांचे आदेशाचा अवमान करणे या बाबत संदर्भ क्रमांक ०२ अन्वये एकूण ०२ दोषारोप ठेवून दोषारोपाचे ज्ञापन त्यांना बजावण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ०३ अन्वये श्री. रावसाहेब एकनाथ डौले यांनी त्यांना देण्यात आलेल्या दोषारोपांचा खुलासा कार्यालयास सादर केलेला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप त्यांनी अमान्य केलेले आहे , सदर दोषारोप प्रकरणी श्री.रावसाहेब एकनाथ डौले यांना म्हणणे सादर करण्याची संधी देणे, न्याय हक्काचे दृष्टीने सर्व आरोपांबाबत विभागीय चौकशी करणे ,आवश्यक असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार श्री.रावसाहेब एकनाथ डौले,ग्रामपंचायत अधिकारी,तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव ता. श्रीरामपूर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोप क्रमांक ०२ संदर्भात खाते निहाय विभागीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

या आदेशान्वये सदर विभागीय चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी म्हणून सहा. आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे वतीने श्री.दिनकर गणेश ठाकरे विस्तार अधिकारी (सांख्यिकी )पंचायत समिती श्रीरामपूर यांची नियुक्ती करणेत येत आहे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याच प्रमाणे श्री.रावसाहेब एकनाथ डौले यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्वकामकाज नियमाप्रमाणे करावे. व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थीत रहावे.

विभागीय चौकशी प्रकरणी चे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादर कर्ता अधिकारी यांना जबावदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी . या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202508020601O4 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 02-08-2025 15:35:43
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१) सहा.आयुक्त, (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक
२/- सोबत श्री.रावसाहेब एकनाथ डौले, ग्रामपंचायत अधिकारी, यांचे गैरवर्तनाबाबतचे दोषारोप समवेत जोडले आहे.

प्रति :- २) श्री.दिनकर गणेश ठाकरे विस्तार अधिकारी (सांख्यिकी )पंचायत समिती श्रीरामपूर
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी
२/- सोबतचा आदेश श्री.रावसाहेब एकनाथ डौले ,ग्रामपंचायत अधिकारी,यांना बजावून तो मिळालेबाबतची पोहच या कार्यालयास सादर करावी.

(स्वाक्षरीत /-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर